**शालेय पोषण आहार या केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत डेटा एंट्री ऑपरेटरची पदे कंत्राटी पध्दतीने भरण्याबाबत**

# महाराष्ट्र शासन

**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,**

**शासन निर्णय क्र.**शापोआ-२००९/प्र.क्र.९१/प्राशि-४

**मंत्रालय ,मुंबई-४०० ०३२.**

**दिनांक :-** १० फेब्रुवारी, २०१०

**प्रस्तावना:-** राज्यामध्ये शालेय पोषण आहार ही केंद्र पुरस्कृत योजना राबविण्यात येत आहे. या योजनेचा विस्तार करुन दि.८.८.२००८ च्या शासन निर्णयान्वये ही योजना इ.६ वी ते ८ वी च्या विद्यार्थ्यांना लागू करण्यात आलेली आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार या योजनेंतर्गत, विद्यार्थ्यांना शिजविलेले अन्न देण्यात येते. ही केंद्र पुरस्कृत योजना सन १९९५-९६ पासून सुरु करण्यात आली. तेव्हापासून या योजनेचे कामकाज करण्यासाठी शिक्षण संचालनालय स्तरावर एक सांख्यिकी अधिकारी, एक लिपिक आणि एक लघुलेखक अशी तीनच पदे निर्माण करण्यात आलेली आहेत. या योजनेचा वाढलेला विस्तार तसेच योजनेचे बदलेले स्वरुप विचारात घेता, या योजनेंतर्गत डेटा एंट्री ऑपरेटर ही पदे कंत्राटी पध्दतीने भरुन या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

**शासन निर्णय:-** शालेय पोषण आहार या केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत खालीलप्रमाणे ३९७ डेटा एंट्री ऑपरेटरची पदे कंत्राटी पध्दतीने नियुक्त करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे:-

| अ.क्र. | क्षेत्र | पदसंख्या | एकूण पदसंख्या |
|---|---|---|---|
| १) | मंत्रालय स्तरावर | ४ पदे | ४ |
| २) | शिक्षण संचालनालय स्तरावर | ६ पदे | ६ |
| ३) | जिल्हा स्तरावर | प्रत्येकी १ | ३५ |
| ४) | तालुका स्तरावर | प्रत्येकी १ | ३५२ |
| | | **एकूण पदे** | **३९७** |

२. डेटा एंट्री ऑपरेटरची पदे तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून पुढील १ वर्षाच्या कालावधीसाठी करण्यात येईल. एक वर्षाचा कालावधी संपल्यानंतर नियुक्त्या आपोआप

संपूष्टात येतील. या योजनेंतर्गत डेटा एंट्री ऑपरेटरची पदे कंत्राटी पध्दतीने भरण्यासाठी खालीलप्रमाणे अटी व शर्ती विहित करण्यात येत आहेत:-

**३. उमेदवाराची अर्हता :-**

(अ) या योजनेंतर्गत कंत्राटी पध्दतीने नियुक्त करावयाच्या डेटा एंट्री ऑपरेटरसाठी, उमेदवार किमान १२ वी पास असणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे पदवीधर उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

(ब) उमेदवारास टंकलेखनाची गती मराठी भाषेसाठी ३० शब्द प्रति मिनिट आणि इंग्रजी भाषेसाठी किमान ४० शब्द प्रति मिनिट अशी असणे आवश्यक आहे.

(क) उमेदवारास संगणकाचे ज्ञान असणे आवश्यक आहे. सदर उमेदवार MS-CIT ही परीक्षा किंवा केंद्र शासनाची या संदर्भातील तुल्यबळ संगणकाची परीक्षा उत्तीर्ण झालेला असणे आवश्यक आहे.

(ड) उमेदवाराचे वय किमान १८ वर्षे व कमाल ३५ वर्षे या दरम्यान असावे.

**४. परिश्रमीक (एकत्रीत मानधन):-** डेटा एंट्री ऑपरेटर या पदावर नियुक्त करण्यात येणा-या कंत्राटी कर्मचा-यास मासिक एकत्रित ठोक मानधन रु. ६०००/- (रुपये सहा हजार फक्त) एवढे देण्यात यावे. सदर कर्मचा-यास इतर कोणत्याही प्रकारचे भत्ते अनुज्ञेय राहणार नाहीत.

५. कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेल्या डेटा एंट्री ऑपरेटर या कर्मचा-यास एक वर्षाच्या कंत्राटी सेवेमध्ये ८ नैमित्तिक रजा अनुज्ञेय राहतील.

६. कंत्राटी तत्वावर नियुक्त केलेल्या कर्मचा-याचे सेवा करारपत्रात नमूद केलेल्या कालावधीनंतर आपोआप संपूष्टात येईल.

७. डेटा एंट्री ऑपरेटर म्हणून नियुक्त केलेल्या कंत्राटी पध्दतीच्या कर्मचा-यास नियमित सेवेचे कोणतेही लाभ मिळणार नाहीत. तसेच एक वर्षाच्या कंत्राटी सेवेच्या आधारावर त्याला शासकीय सेवेमध्ये नियुक्तीसाठी कोणतेही हक्क असणार नाहीत.

८. संबंधित कर्मचा-याविरुध्द शासकीय कामकाजाबाबत तक्रार आल्यास व त्यानुसार दोषी आढळल्यास विहित कालावधीपूर्वीच कंत्राटी सेवा समाप्त करण्यात येईल.

९. कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेल्या कर्मचा-यास या शासन निर्णयासोबत जोडलेल्या **परिशिष्ट-अ** मध्ये नमूद केलेल्या नमुन्यात करारनामा करुन द्यावा लागेल. सदर करारनामा संबंधित

कर्मचा-याने प्रत्यक्ष रुजू होण्यापूवी करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे कर्मचा-यावर कोणत्याही प्रकारचा गुन्हा किंवा आरोप नसल्याचे प्रतिज्ञापत्र स्वतंत्रपणे सादर करणे आवश्यक आहे.

१०. कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेल्या डेटा एंट्री ऑपरेटर या कर्मचा-यासंबंधी सेवा शर्ती, शैक्षणिक अर्हता, एकत्रित ठोक मानधन व नियुक्तीची कार्यपध्दती यासंदर्भात आवश्यक ते बदल तसेच निर्णय घेण्याचे अधिकार शासनास राहतील.

**११. <u>उमेदवारांची निवड प्रक्रीया करण्याची कार्यपध्दती :-</u>** शालेय पोषण आहार या योजनेंतर्गत डेटा एंट्री ऑपरेटरची पदे कंत्राटी पध्दतीने गुणवत्ताधारक उमेदवारांमधून भरण्यासाठी खालीलप्रमाणे निवड प्रक्रिया राबविण्यात यावी:-

**अ)** मंत्रालय स्तरावरील ४ पदे, शिक्षण संचालनालय स्तरावरील ६ पदे अशी एकूण १० पदे कंत्राटी पध्दतीने भरण्यासाठी शिक्षण संचालनालय स्तरावर निवड प्रक्रिया करण्यात यावी. त्यासाठी शिक्षण संचालक(प्राथमिक),महाराष्ट्र राज्य,पुणे यांनी निवड प्रक्रिया समिती स्थापन करावी. सदर समितीमध्ये एक अध्यक्ष, तीन सदस्य (पैकी एक सदस्य शासनाचा राहील) आणि एक सदस्य सचिव यांचा समावेश करण्यात यावा.

**ब)** प्रत्येक जिल्हयामध्ये असलेली तालुका स्तरावरील पदे तसेच जिल्हा स्तरावरील पदे यासाठी त्या जिल्हयामध्ये जिल्हापरिषद स्तरावर निवड प्रक्रिया राबविण्यात यावी. त्यासाठी शिक्षणाधिकारी(प्राथमिक),जिल्हापरिषद यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मान्यतेने निवड प्रक्रिया समिती स्थापन करावी. सदर समितीमध्ये एक अध्यक्ष, तीन सदस्य आणि एक सदस्य सचिव यांचा समावेश करण्यात यावा.

**क)** डेटा एंट्री ऑपरेटरची पदे कंत्राटी पध्दतीने भरण्यासाठी जिल्हास्तरावरुन २ प्रमुख वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देवून उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात यावेत. त्याचप्रमाणे शिक्षण संचालनालय स्तरावरुन संपूर्ण राज्यभर सदर पदे कंत्राटी पध्दतीने भरण्याबाबत जाहिरात देऊन प्रसिध्दी देण्यात यावी.

**ड)** जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या विहित कालावधीत अर्ज दाखल केलेल्या व विहित अटी व शर्तीची पूर्तता करणा-या उमेदवारांची निवड खालील पध्दतीने करण्यात यावी:-

**ड-१)** डेटा एंट्री ऑपरेटर या पदासाठी किमान इ.१२ वी पास, मराठी टायपिंग ३० शब्द प्रति मिनिट, इंग्रजी टायपिंग ४० शब्द प्रति मिनिट आणि संगणकाचे ज्ञान असल्याचा पुरावा म्हणून

MS-CIT परीक्षा उत्तीर्ण, अशी अर्हता पूर्ण करणा-या उमेदवारांची गुणक्रमानुसार यादी बनविण्यात यावी. सदर यादी बनविताना खालीलप्रमाणे उमेदवारांना गुण देण्यात यावेत.

**ड-२)** उमेदवारास इ.१० वीमध्ये मिळालेल्या गुणांची टक्केवारी तसेच इ.१२ वीमध्ये मिळालेल्या गुणांची टक्केवारी यांची एकत्रित बेरीज करुन उमेदवारांची गुणानुक्रमे यादी(मेरीट लिस्ट) तयार करण्यात यावी. त्याचप्रमाणे एखादा उमेदवार पदवीधर असल्यास त्याला फक्त १० गुण बोनस देण्यात यावेत. उदाहरण स्वरुपाने नमूद करावयाचे झाल्यास "क्ष" व्यक्तीस इ.१० वीमध्ये ६५% व इ.१२ वीमध्ये ६२.५% गुण असल्यास त्याचे एकत्रित गुण १२७.५ असे येतील. त्याचप्रमाणे "क्ष" उमेदवार पदवीधर असल्यास त्यास १० बोनस गुण मिळाल्यामुळे त्याचे गुणांची एकत्रित बेरीज १३७.५ अशी येईल.

**ड-३)** डेटा एंट्री ऑपरेटर निवड प्रक्रिया क्षेत्रामध्ये मंजूर पदसंख्येच्या ५ पट उमेदवारांची गुणानुक्रमे यादी बनविण्यात यावी.

**ड-४)** सदर यादीमधील उमेदवारांची मुलाखत व संगणक तसेच टंकलेखनाची प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यात यावी. सदर निवड प्रक्रियेसाठी उमेदवाराने एका पेक्षा जास्त जिल्हयामध्ये अर्ज भरला तरी सर्व जिल्हयामध्ये एकाच दिवशी मुलाखत घेण्यात यावी व ज्या ठिकाणी उमेदवार मुलाखतीस उपस्थित राहील त्याच ठिकाणी त्याच्या उमेदवारीचा विचार केला जाईल. सदर मुलाखत व प्रात्यक्षिक परीक्षेसाठी खालीलप्रमाणे गुण ठेवण्यात यावेत:-

१) मुलाखत -- १० गुण

२) संगणक प्रात्यक्षिक -- १० गुण

३) टंकलेखन प्रात्यक्षिक -- १० गुण

**ड-५)** वरील "क" व "ड" येथील गुण एकत्रित करुन मंजूर पदांएवढी उमेदवारांची निवड यादी प्रसिध्द करण्यात यावी. त्याचप्रमाणे तेवढयाच पुढील उमेदवारांची प्रतिक्षा यादी प्रसिध्द करण्यात यावी.

**१२.** या निवड यादीतून उमेदवारांची त्यांच्या गुणानुक्रमानुसार कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपात डेटा एंट्री ऑपरेटर म्हणून नियुक्ती देण्यात यावी. सदर उमेदवारांकडून नियुक्तीपूर्वी सोबत जोडलेल्या नमुन्यात करारनामा(बंधपत्र) करुन घेण्यात यावा.

१३. या योजनेंतर्गत कंत्राटी पध्दतीने डेटा एंट्री आपॅरेटर पदावर नियुक्त करावयाची निवड प्रक्रिया ही तात्काळ करण्यात यावी.

१४. शालेय पोषण आहार योजनेंतर्गत डेटा एंट्री ऑपरेटर या कंत्राटी तत्वावरील कर्मचा-यांचा खर्च या योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून प्राप्त होणा-या व्यवस्थापन, संनियंत्रण आणि मुल्यमापन या केंद्र शासनाच्या निधीतून भागविण्यात यावा.

१५. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने अनौ.संदर्भ क्र.२४६/व्यय-५, दि.८.४.२००९ आणि अनौ.संदर्भ क्र.२२९/०९/वि.सु.१, दि.२१.४.२००९ अन्वये तसेच सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

१६. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संगणकीय संकेतस्थळावर (www.maharashtra.gov.in) २०१००२१०१६०२०३००१ क्रमांकाने प्रसिध्द करण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

(ना.ऊ.रौराळे)
उप सचिव,महाराष्ट्र शासन

प्रति,
मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
मुख्यमंत्र्याचे /उपमुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
मंत्री / राज्यमंत्री , शालेय शिक्षण यांचे खाजगी सचिव
शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
शिक्षणाधिकारी (प्राथमिक), सर्व जिल्हे
ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
शालेय शिक्षण विभाग (सर्व कार्यासने)
निवड नस्ती, प्राशि-४

# <u>परिशिष्ट-अ</u>

( शासन निर्णय, शालेय शिक्षण क्रीडा विभाग, क्र. शापोआ २००९/प्र.क्र.९१/प्राशि-४ )
दि.          फेब्रुवारी, २०१० चे परिशिष्ट.

**<u>रु.१००/- च्या मुद्रांक पेपरवर करारनामा करणे.</u>**

प्रति,

..............................

..............................

(येथे नियुक्ती प्राधिकाऱ्याचे नाव व पत्ता लिहीण्यात यावा.)

ज्या अर्थी (या ठिकाणी नियुक्ती प्राधिकाऱ्यांचे पदनाम लिहिण्यात यावे.) (यापुढे नियुक्ती प्राधिकारी असा उल्लेख केला जाईल.) यांनी त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रमांक ...................... दिनांक........................नुसार

श्री./श्रीमती/कुमारी....................................................................

राहणार.................................... (यापुढे उमेदवार म्हणून उल्लेख केला जाईल.) याची नियुक्ती पत्रात नमूद केलेल्या अटी व शर्तीवर शालेय पोषण आहार योजनेंतर्गत डेटा एन्ट्री ऑपरेटर पदावर कंत्राटी पध्दतीने .......................या कालावधीसाठी प्रति माह रुपये ६०००/- एवढ्या मानधनावर नियुक्ती केली आहे. (यापुढे संबंधीत नियुक्ती पत्र असा उल्लेख केला जाईल.)

आणि, त्या अर्थी, मी श्री/श्रीमती/कुमारी................................................... लिहून देतो/देते की,

१. मला प्राप्त झालेल्या नियुक्ती पत्रातील सर्व अटी व शर्ती मी वाचल्या आहेत आणि त्या मला समजल्या आहेत. त्या सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

२. जर माझ्याकडून एखाद्या अटी व शर्तीचा भंग झाला तर ........................ पदावरील माझी नियुक्ती रद्द केली जाईल याची मला जाणीव आहे.

३. मी या संदर्भातील सर्व माहिती जाणून घेतल्यानंतर जाणीवपूर्वक व स्वेच्छेने सदर कंत्राटी नियुक्ती स्वीकारीत आहे.

४. या कंत्राटी नियुक्तीनंतर मला कायम स्वरुपी नियुक्ती मिळण्याचा हक्क राहणार नाही.

तसेच या करारपत्राच्या कालावधीनंतर शासनावर कोणतीही जबाबदारी राहणार नाही व या कंत्राटी सेवेशी निगडीत कोणत्याही प्रकारची मागणी मी करणार नाही, अशी या करारपत्राद्वारे हमी देत आहे.

५. माझे कामकाज असमाधानकारक आढळून आल्यास माझी नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल. याबद्दल माझी कुठलीही तक्रार राहणार नाही.

श्री./श्रीमती/कुमारी ....................................................

स्वाक्षरी............................

दिनांक..............................

समक्ष-

१)

२)

(नियुक्ती प्राधिकाऱ्याचे पदनाम) यांच्यासाठी आणि यांच्या वतीने

-------------------------------------------------------------------------------------------

(नियुक्ती प्राधिकाऱ्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याचे नांव व पदनाम)

XXXXXXXXX